दिल्या.

# के. के. वाघतर्फे १ सप्टेंबर रोजी इको फ्रेंडली कार्यशाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

के के वाघ शिक्षण संस्था, नाशिक आणि स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्स्चेंज (स्माईल) व स्पीनच सेंटर ऑफ एक्सलन्स यांचे संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक १ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ठीक ८ वाजता के के वाघ अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनच्या क्रीडांगणावर इको फ्रेंडली गणेशा अर्थात शाडू माती कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यशाळेस इयत्ता पहिली ते चौथी, पाचवी ते दहावी, कनिष्ठ-वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना के. के. वाघ फाईन आर्ट्स (ललित कला) महाविद्यालयाच्या तज्ज्ञ मुर्तीकारांमार्फत शाडू माती पासून गणेशमूर्ती तयार करण्याचे मार्गदर्शन मिळणार आहे. पर्यावरण व संवर्धन या सामाजिक जाणिवेतून दरवर्षी शाडूमाती कार्यशाळेचे आयोजन केले जात असते. या कार्यशाळेस नाशिक शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ, जनसंपर्क संचालक मा. अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के एस, बंदी व समन्वयक प्रा. पी. टी. कडवे यांनी केले आहे.

gavkari 28-08-2024